MHRG110007052017

<u>नियमित दिवाणी दावा क्र.८६/२०१७ मधील निशाणी क्र.६३ वरील आदेश</u>
<u>(पारीत दिनांक २८/०६/२०२४.)</u>

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार क्र.१ राम सुदाम सावळे, अर्जदार क्र.२ अशोक सुदाम सावळे, अर्जदार क्र.३ गणपत सुदाम सावळे, अर्जदार क्र.४ राजश्री उर्फ मंदा शंकर कामथेकर, अर्जदार क्र.५ सविता काशीनाथ राणे आणि अर्जदार क्र.६ शोभना श्रीपत पडवळ यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १ नियम १० अन्वये त्यांना प्रस्तुत दाव्यामध्ये पक्षकार म्हणुन समाविष्ट करण्यासाठी सादर केला आहे.

२. अर्जामध्ये नमुद आहे की, प्रस्तुत दाव्यामध्ये अर्जदार हे पक्षकार नाहीत. प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांच्या विरुध्द वाटपा करीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यातील दावा मिळकत मौजे साजे, ता. माणगांव येथील असुन त्याचे वर्णन खालील प्रमाणे.

| अ.क्र. | भूमापन क्र. | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पैसे. |
|---|---|---|---|
| ०१. | ४४/२ | ०–१६–१ पैकी ०–०८–०५ | ०.३७ |
| ०२. | १०७/२४ | ०–१४–० | ०.०६ |
| ०३. | १०७/५६ | ०–०५–० | ०.०३ |
| ०४. | १०६/१८ | ०–१०–० | ०.०६ |

३. सदर मिळकती अर्जदार यांचे पुर्वगामी वडील सुदाम गणपत सावळे यांच्या हिश्श्यास वाटपाने आलेल्या आहेत. तसे वाटप संबंधित वादी यांचे पुर्वगामी भाऊ हरी सावळे व अर्जदार यांचे वडील सुदाम गणपत सावळे यांच्यामध्ये झालेले आहेत. वादी व प्रस्तुत अर्जदार यांच्या कुटुंबाचे मुळ पुरुष गोविंद सावळे हे होते. त्यांना गणपत सावळे व हरी गोविंद सावळे हे दोन कायदेशीर वारस होते. पैकी अर्जदार हे गणपत यांचा एक मुलगा सुदाम यांचे कायदेशीर वारस आहेत, तर वादी आणि प्रतिवादी हे हरी यांचा एकमेव मुलगा

भाऊ यांचे कायदेशीर आहेत.

४. वर नमुद केल्या प्रमाणे भाऊ आणि सुदाम हे हयात असताना त्यांनी त्यांच्या मिळकतींचे वाटप करुन वर नमुद मिळकती अर्जदार यांचे पुर्वगामी सुदाम यांच्या हिश्श्यास दिल्या होत्या. परंतु सदरचे वाटप हे तोंडी असल्यामुळे त्याचा अंमल महसुल दप्तरी देण्यात आलेला नाही. आजही वर नमुद मिळकती अर्जदार यांच्या प्रत्यक्ष ताबे कब्जात असुन त्याची कल्पना प्रस्तुत दाव्यातील वादी व प्रतिवादी या दोघांनाही आहे. तसेच अर्जदार यांची दावा मिळकतीं मधील वहिवाट गावातील सर्व ग्रामस्थ यांना माहिती आहे.

५. वर नमुद केल्याप्रमाणे अर्जदार हे दाव्याचे कामी पक्षकार नाहीत. दावा मिळकती अर्जदार यांच्या हिश्श्यास वाटपाने आल्या असल्यामुळे त्या त्यांच्या नावे असणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा दावा हा वाटपाकरीता असल्यामुळे व वर नमुद मिळकती अर्जदार यांच्या हक्काच्या असल्यामुळे अर्जदार यांना सदर दाव्याचे कामी प्रतिवादीपणात सामील करुन घेणे आवश्यक आहे. अर्जदार यांच्या अपरोक्ष सदर दाव्याचे कामी कुठलाही आदेश, हुकूमनामा झाल्यास अर्जदार यांचे पैशात कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. त्यामुळे अर्जदार यांनी प्रस्तुतच्या प्रकरणात प्रतिवादीपणात समाविष्ट करण्यात यावे अशी विनंती केली आहे.

६. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे सादर करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. प्रतिवादी यांनी नमुद केले की, अर्जदारांचा दावा मिळकतीशी हक्क हितसंबंध असल्या बाबत सकृतदर्शनी कोणताही पुरावा अर्जदारांनी दाखल केलेला नाही. त्यामुळे अर्जदारांचा हक्क हितसंबंध असल्या बाबत सकृतदर्शनी हक्क दाखविल्या खेरीज अर्जदारांचा अर्ज मान्य करता येणार नाही. करीता अर्जदारांनी केलेली कथने वस्तुस्थितीस धरुन नसल्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

७. वादींनी त्यांचे म्हणणे सादर करुन अर्जास हरकत नाही असे नमुद केले आहे.

८. वादींनी सदरचा दावा प्रतिवादी लिला उर्फ जयश्री दाजी पडवळ यांच्या विरुध्द ठरावा करीता व वाटपाकरीता दाखल केलेला आहे. अर्जदार यांचे म्हणणे आहे की, वादी यांचे पुर्वगामी व त्यांचे वडील यांच्यामध्ये दावा मिळकतीचे वाटप झालेले आहे.

वादी व अर्जदार यांच्या कुटुंबाचे मुळ पुरुष गोविंद सावळे हे होते. त्यांना गणपत व हरी सावळे हे दोन कायदेशीर वारस होते. अर्जदार गणपत याचा मुलगा सुदाम यांचे वारस आहेत. वादी व प्रतिवादी हे हरी यांचा एकमेव मुलगा भाऊ यांचे कायदेशीर वारस आहेत.

९. अर्जदार यांनी सदर अर्जा कामी फेरफार क्रमांक २६७ निशाणी क्र.६६ च्या यादी सोबत दाखल केला आहे. अभिलेखावरील दस्तऐवजा वरुन दिसुन येते की, अर्जदार हे गणपत सावळे यांचा मुलगा सुदाम सावळे यांचे वारस आहेत.

१०. वरील बाबींचा एकत्रीतरित्या बारकाईने विचार केला असता, मी या निष्कर्षाला आलो आहे की, अर्जदार यांचे वडील सुदाम सावळे व वादी यांचे पुर्वगामी हरी सावळे यांचे पुर्वगामी गोविंद सावळे हे होते. म्हणुन अर्जदार हे प्रस्तुत प्रकरणात आवश्यक व महत्वाचा पक्षकार आहेत. अर्जदार यांना प्रस्तुत प्रकरणात पक्षकार म्हणुन समाविष्ट केल्यानंतर वादी व प्रतिवादी यांना क्षती व हानी पोहचेल असे दिसुन येत नाही. सदर अर्जदार यांना पक्षकार म्हणुन समाविष्ट केल्यानंतर दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. तसेच, दावा निकाली काढण्यासाठी अर्जदार हे महत्वाचे व आवश्यक पक्षकार असल्याचे दिसुन येते. तसेच, प्रक्रियेची बाहुल्यता टाळण्यासाठी देखील अर्जदार यांना पक्षकार म्हणुन समाविष्ट करणे महत्वाचे आहे. म्हणुन अर्जदार यांना प्रतिवादी क्र.२ ते ७ म्हणुन प्रस्तुत दाव्यात समाविष्ट करण्यात यावे. प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. निशाणी क्र. ६३ वरील अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार यांना प्रतिवादी क्र. २ ते ७ म्हणुन समाविष्ट करण्यात यावे.

३. वादींनी पुढील तारखेपर्यंत दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत सादर करावी.

GAJANAN CHANDRAKANT FULZALKE

Digitally signed by GAJANAN CHANDRAKANT FULZALKE
Date: 2024.06.28 17:00:18 +0530

माणगांव, (जी. सी. फुलझळके)

दिनांक – २८/०६/२०२४. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माणगांव